# श्री गणरायाचे अभंग

धरोनिया फरश करी । भक्तजनांची विघ्ने वारी ॥
ऐसा गजानन महाराजा॥ त्यांचे चरणी लाहो माझा ॥
शेंदूर शमी बहु प्रिय ज्याला । तुरा दुर्वांचा शोभला ॥
उंदिर असे जयाचे  वाहन । माथां जडित मुगुट पूर्ण ॥
नाग यज्ञोपवित रुळे । शुभ्र वस्त्र शोभित साजिरे ॥
भावमोदक हराभरी । तुका भावे पूजा करी ॥१॥